# कार्यालय, नागपूर महानगरपालिका, नागपूर

## शिक्षण विभाग

दुरध्वनी क्र. 0712–2567028
EmailID:education.nmc@gmail.com

जा.क्र. 3975 / शि.वि. / 2015
दि. 23/ 04 / 2015

प्रति,

मुख्याध्यापक / मुख्याध्यापिका,
सर्व प्राथ. / उच्च प्राथ. / माध्य. शाळा,
म.न.पा., नागपूर.

**विषय :– मनपा शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचे आधार कार्ड तयार करण्याबाबत.**

संदर्भ :– शालेय शिक्षण व क्रिडा विभाग, शासन निर्णय क्र. संकीर्ण–2015 / प्र.क्र.49 / एस.डी.–1 दि. 21.04.2015.

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने कळविण्यात येते की, राज्यातील शाळांमध्ये प्रत्येक बालकांचे आधार कार्ड काढून ते प्रवेश क्रमांकाशी जोडण्यात यावे. शाळांनी प्रवेश दिलेल्या प्रत्येक बालकाचे आधार कार्ड तयार करण्यासाठी दि. 27 एप्रिल ते 26 जून हा कालावधी निश्चित केला आहे. आपल्या शाळेतील 100 टक्के विद्यार्थ्यांचे आधारकार्ड तयार करणे अनिवार्य आहे. याबाबत पालकांची तातडीने सभा आयोजित करून विद्यार्थ्यांचे आधार कार्ड काढण्याबाबत सूचना द्याव्यात. तसेच याबाबत आपल शाळेत विशेष मोहिम राबविण्यात आल्यास याबाबत आपणांस सूचित करण्यात येईल. या विशेष माहिमेत आपल्या शाळेतील आधारकार्डची स्थिती खालील प्रपत्रामध्ये भरून आपले झोनचे शाळा निरीक्षक यांच्याकडे त्वरीत सादर करावयाचे आहे.

| अ.क्र. | शाळेचे नाव | एकूण विद्यार्थी | पूर्वी आधार कार्ड तयार विद्यार्थी संख्या | आज आधार कार्ड तयार विद्यार्थी संख्या | उर्वरीत विद्यार्थी संख्या | आधार न काढण्याची कारणे |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | | |

**तसेच शाळेतील सर्व विद्यार्थ्यांना खालील प्रतिज्ञा द्यावी.**

आम्ही सर्व विद्यार्थी, पालक, गावकरी आणि शिक्षक अशी प्रतिज्ञा करतो की आमच्या शाळेतील प्रवेश घेतलेल्या प्रत्येक बालकाचे आधारकार्ड काढून घेण्यासाठी आम्ही प्रयत्नशील राहू.

विद्यार्थी लाभाच्या सर्व योजना या आधारकार्डशी जोडण्यात येतील आणि त्याचा लाभ प्रत्यक्ष विद्यार्थ्यांना घेता येईल याची आम्हांला जाणीव आहे. तसेच आधारकार्डाच्या क्रमांकाशी आमची शाळेतील प्रगती जोडण्यात आल्यामुळे आम्हाला कोणता विद्यार्थी काय व किती शिकत आहे याचीही जाणीव हाईल. या आधार कार्डशी संलग्न झाल्यामुळे शिक्षण पूर्ण होईपर्यंत विद्यार्थी शाळेशी जोडलेले राहून कोणीही शाळाबाहय राहणार नाही. अशीही आम्ही प्रतिज्ञा करीत आहो.

**जयहिंद – जय भारत**

शिक्षणाधिकारी
नागपूर महानगरपालिका, नागपूर

PC:2/D:\reshma:/Tembhurne sir \ Letter 1.doc